# निशाणी क्र. २५१ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३१ चे वारस यांना रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा हा दावा मिळकतीचे वाटप होण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ३१ मयत झाल्यानंतर त्याच्या पश्चात त्याच्या वारसांविरुद्ध हा दावा चालविण्याचा अधिकार वादीस आहे असे मला वाटते. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र. ३१ चे वारस यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. या वारसांना पक्षकार केल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. मात्र तसे न केल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना प्रतिवादी क्र. ३१ चे वारस म्हणून रेकॉर्डवर घेण्याची संधी नाकारल्यास न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. प्रतिवादी क्र. ३१ चे वारस हे या वाटपाच्या दाव्याकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३१ चे वारसांना रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

# <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि. क्र. २४७ व २४९ वरील आदेशाची पूर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ३१ चे वारसांना रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दयावी.

Digitally signed by Girish Sudarshan Mane
Date: 2019.11.19 16:47:52 +0530

स्थळ : कोरेगाव

दिनांक : १९/११/२०१९ दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.